# श्रीराम कला  महिला महाविद्यालय,धामणगाव रेल्वे
# विषय : गृह अर्थशास्त्र
# अभ्यास मंडळ अंतर्गत घेण्यात आलेले विविध उपक्रम
# सत्र 2022-2023

अभ्यासमंडळाचे सर्व उद्दिष्टे साध्य व्हावे म्हणून सत्र 2022-23 या शैक्षणिक क्षेत्रात पुढील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१) स्तनपान सप्ताह निमित्त ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथे भेट (5 ऑगस्ट 2022)

२) गृह अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन (6 सप्टेंबर 2022)

३) पोषण सप्ताह निमित्त डीश डेकोरेशन आणि ग्रीटिंग स्पर्धा (7 सप्टेंबर 2022)

४) Event management अंतर्गत वाढदिवसाच्या पार्टीचे आयोजन (3 अप्रील 2023)

५) स्वयंरोजगार अंतर्गत घरगुती तयार केलेल्या पदार्थांच्या विक्री आणि प्रदर्शनीचे आयोजन (13 एप्रिल 2023)

६) ब्लॉक प्रिंटिंग (ठसा छपाई) च्या प्रात्यक्षिकाचे  आयोजन (17 एप्रिल 2023)

## अभ्यास मंडळाची कार्यकारणी

| | | |
|---|---|---|
| कु. इशा  भोंगाडे | बीए भाग 3 | अध्यक्ष |
| कु. सोनल थावे | बीए भाग 3 | उपाध्यक्ष |
| कु. अर्पिता निसार | बीए भाग 3 | सचिव |
| कु. निधी खडसे | बीए भाग 2 | सदस्य |
| कु. उज्वला मेश्राम | बीए भाग 2 | सदस्य |
| कु. निकिता वंजारी | बीए भाग 2 | सदस्य |
| कु. अस्मिता  तेलंगे | बीए भाग 1 | सदस्य |
| कु. सीमा पेंदामे | बीए भाग 1 | सदस्य |
| कु. जयश्री भोंडे | बीए भाग 1 | सदस्य |

**१)स्तनपान सप्ताह नीमीत्य ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथे भेट (५ आगस्ट २०२२) :-**

बी. ए. भाग 3 च्या अभ्यासक्रमानुसार १ आगस्ट ते ५ ऑगस्ट हा स्तनपान सप्ताह करणात आला.या निमित्याने ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथे सर्व विद्यार्थिनी सोबत भेट देण्यात आली. तीथे गर्भवती स्त्रीयांच्या वार्ड मध्ये जावून स्तनदा मातांची काळजी कशी घेतली जाते हे तेथील नर्स सौ.वंदना जाधव यांनी विद्यार्थीनीना समजाऊन सांगितले. तसेच नुपूर पगारे यांनी त्यांना कोणता आहार दिला जातो,बाळाला दुध कसे पाजावे. या बद्दल सुध्दा मार्गदर्शन केले. गरोदर महिलांनी ९ महीने कशी काळजी घ्यायची हे सुद्धा ग्रामीण रुग्णालयातील नर्सनी विद्यार्थीनीना समजाऊन सांगीतले.

तसेच स्तनपान सप्ताह निमित्य ग्रामीण रुग्णालयातील स्तनदा मातांना बीस्कीट पुडे व फळे वाटप करण्यात आली. यासाठी सर्व विद्यार्थीनीनी ग्रामीण रुग्णालयामध्ये उपस्थीत दर्शवीली होती. तसेच सोबत गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मोनाली इंगळे यांनी शैक्षणिक भेटीचे आयोजन केले होते.









**ग्रामीण रुग्णालयात बी.ए. भाग -३ च्या विद्यार्थिनीची शैक्षणिक भेट**

**2)गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन (६ सप्टेंबर २०२२) :**

गृहअर्थशास्त्र मंडळाचे उद्घाटन दिः 6 बाटेंबर २०२२ ला घेण्यात आले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत सर, तर कार्यक्रमाचे उदघाटक प्रा.डॉ. पाथरे सर (शाररीक शिक्षण संचालक) हे होते. सुरवातीला कार्यकारीणी गठीत करण्यात आली.

कार्यक्रमाची रूपरेषा विभाग प्रमुख प्रा.डॉ. मोनाली इंगळे यानी समजावून सांगितली उद्घाटक डॉ. पाथरे सर यानी विदयार्थिनींना विषयाची माहीती दीली.या अभ्यास मंडळावर ज्या विद्यार्थिनींची निवड झाली. त्याबददल त्यांचे अभीनंदन केले. गृहअर्थशास्त्र हा विषय विद्यार्थिनीसाठी कीती महत्वचा आहे. याबददल मार्गदर्शन केले.

प्राचार्यानी सुद्धा विद्यार्थिनीना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कु.ईशा भोंगाडे यांनी केले व आभार प्रदर्शन अर्पिता निसार यांनी केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थिनींनी उत्स्फुर्त प्रतीसाद दिला.







अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**3)**पोषण साप्ताह निमित्य डीश डेकोरेशन आणी ग्रीटींग स्पर्धा ( **7** सटेंबर २०२२) :-

१ ते ७ सप्टेंबर हा जागतीक पोषण सप्ताह म्हणून साजरा केला जातो. गृहअर्थशास्त्र विभागा अंतर्गत डीश डेकोरेशन व ग्रीटींग स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे परीक्षण महाविदयालयाच्या ग्रंथपाल प्रा.डॉ. नीता केने आणि प्रा. सुवर्णा घोपे यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्राध्यापक यांनी सुध्दा सहभाग घेतला होता. परिक्षकांनी नीवडलेल्या. विद्यार्थिनीला बक्षीस सुध्दा विभागातर्फ देण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थिनींना उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.







डीश डेकोरेशन आणी ग्रीटींग स्पर्धा

**4)Event management** अंतर्गत वाढदिवसाच्या पार्टिचे आयोजन (३एप्रिल २०२३):-

विद्यार्थिनींना कार्यक्रमाचे व्यवस्थापण करता यावे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बी.ए. भाग - ३ च्या विद्यार्थिनींनी वाढदिवसाच्या पार्टीचे आयोजन कसे करायचे याचे मार्गदर्शन केले. कु.नेहा येलेकार या विदयार्थिनीचा वाढदीवस ३ एप्रीलला साजरा करण्यात आला. आणि त्यांनी अतिशय  चांगल्या पदधतीने हा कार्यक्रम आयोजीत केला. पहिले त्यांनी कार्यक्रमाची पत्रीका ठरवली आणि मग महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षेत्तर कर्मचा-यांना या पार्टीसाठी आमंत्रीत केले.

येणाऱ्याचे स्वागत त्यांनी गुलाबाचे फुल देऊन केले. सर्व विद्यार्थिनी मिळून केक आणला. केक कापुन आणि तीचे औक्षण करून तीचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्याची वाढदिवसाची व्यवस्था पाहून सर्वांनी त्यांचे कौतुक केले. आणि त्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.








**Event management** अंतर्गत वाढदिवसाच्या पार्टिचे आयोजन

**5)स्वयंरोजगार अंतर्गत घरगुती तयार केलेल्या पदार्थाच्या विक्री आणि प्रदर्शनीचे आयोजन (१३ एप्रील २०२३) :-**

बी.ए. भाग २ च्या विद्यार्थिनीनी घरगुती तयार केलेल्या पदार्थाचे प्रदर्शन लावले होते. यामध्ये त्यांनी उन्हाळयामध्ये केलेले सर्व घरगुती पदार्थ वीक्रीसाठी ठेवले होते. यामध्ये ज्वारीच्या पीठाचे धापोडे, बटाट्याचे चीप्स, पापड, वड्या, शेवया, कुरड्या हे सर्व पदार्थ वीक्रीसाठी महाविद्यालय यामध्येच गृहअर्थशास्त्र वीभागाच्या वीदयार्थिनीनी छोटेसे Stall लावले होते. आणि महाविदयालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्या सर्व पदार्थाची खरेदी केली सर्व विध्यार्थिनींना त्यापासून पैशांची मिळकत झाली.



अशाप्रकारे आपण जर हे घरगुती पदार्थ तयार करुन वीकले. तर त्यापासुन आपन आपल्या पायावर उभे राहु शकतो, याची विद्यार्थिनींना जाणीव झाली. आणि त्यांना स्वयंरोजगार हा आर्थिक स्वावलंबनासाठी फायदेशीर ठरू शकतो याची त्याना जाणीव झाली.






**पदार्थाच्या विक्री आणि प्रदर्शनीचे आयोजन**

**6)Block Printing (ठसा छपाई) च्या प्रात्यक्षिकाचे आयोजन (१७ एप्रिल २०२३) :-**



बी.ए. भाग १ च्या विद्यार्थिनीसाठी गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे प्रात्यक्षिका अंतर्गत विदयार्थिनींना ठसा छपाई हे कापडावर कसे करायचे याचे प्रशिक्षण दिले. साडी, ड्रेस, टेबलक्लाथ, चादर ही ठसा छपाई कशी करायची हे शिकवण्यात आले. ते शिकवील्यानंतर त्यांना सरावाने चांगले ठसा छपाई करुन त्या आपल्या पायावर उभे राहू शकतात याचे मार्गदर्शन केले.



बी.ए. झालानंतर त्यानी ठसा छपाई चे बाहेरून चांगले प्रशिक्षण घेतले. तर त्या त्यामध्ये आपले करीअर करू शकतात. आणि स्वत:च्या पायावर उभे राहू शकतात.

**Block Printing चे आयोजन** यामध्ये महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

अश्या प्रकारे गृहअर्थशास्त्र विभाग विज्ञार्थिनींच्या विकासासाठी नेहमीच तत्पर असतो. आणि महाविद्यालयातील विद्यार्थिनींना स्वताच्या पायावर उभे राहून अर्थार्जुन करण्यासाठी हा विभाग नेहमीच सहकार्य करीत असतो.